# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१७

**वेळ: २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

iii. **१ ते ५** प्रश्न इतिहास व **६ ते ९** प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

**प्र.१. अ. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत लिहा (तीनपैकी तीन):** [३]

१. पोर्तुगीज राजा __________ याने नौकानयनाला उत्तेजन दिले.
(विल्यम, हेन्री, निकोलस)

२. जर्मनी, ऑस्ट्रिया व __________ यांच्यात त्रिराष्ट्र मैत्री करार झाला.
(फ्रान्स, जपान, इटली)

३. अठराव्या शतकापर्यंत __________ हा खंड अज्ञात खंड म्हणून ओळखला जात होता.
(आशिया, आफ्रिका, अमेरिका)

**ब. 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब'स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा:** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | शास्त्रज्ञ गोडार्ड | अ. | फॅसिस्ट पक्ष |
| २. | ॲडॉल्फ हिटलर | ब. | सेंट पीटर्सबर्गच्या राजवाड्यावर मोर्चा |
| ३. | फादर गेपॉन | क. | नाझीपक्ष |
| | | ड. | अग्निबाण शास्त्राचा जनक |

**प्र.२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [४]

१. आफ्रिकेच्या अंतर्गत भागाचा शोध घेण्याचा फारसा प्रयत्न का झाला नाही?

२. युरोपीय राष्ट्रांनी शस्त्रसज्जता का वाढवली?

३. राष्ट्रसंघाची उद्‌दिष्ट्ये कोणती होती?

**प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [४]

१. पोर्तुगिजांना भारतात साम्राज्य निर्माण करता आले नाही.

२. रशियात सामान्य जनतेची व कामगारांची स्थिती दयनीय झाली होती.

३. पहिल्या महायुद्धानंतर युरोपातील अनेक राष्ट्रांमधील लोकशाही राष्ट्रे कोलमडू लागली.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [६]

१. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेपूर्वीची पार्श्वभूमी थोडक्यात विशद करा.

२. जर्मनीत हिटलरने कशाप्रकारे सत्ता मिळवली?

३. जागतिकीकरणाचे तोटे लिहा.

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा (तीनपैकी दोन):** [८]

१. साम्राज्यवादाचे इष्ट परिणाम लिहा.

२. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मवाळ व जहालांच्या योगदानाची माहिती लिहा.

३. शीतयुद्धाची कारणे थोडक्यात लिहा.

**प्र.६. कंसातील योग्य शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा व विधाने पुन्हा लिहा (तीनपैकी तीन):** [३]

१. भारतात __________ प्रकारची लोकशाही आहे.

(प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, अध्यक्षीय, मिश्र)

२. __________ हा देश भाषेच्या बाबतीत एकसंध आहे.

(भारत, स्वित्झर्लंड, चीन, श्रीलंका)

३. टोकाची __________ असेल, तर लोकशाही धोक्यात येते.

(विषमता, जागरूकता, एकात्मता, सहिष्णुता)

**प्र.७. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा (पाचपैकी तीन):** [३]

१. सार्वमत केव्हा वापरले जाते?

२. प्रादेशिक विषमता म्हणजे काय?

३. राजकीय पक्षांचे प्रमुख उद्दिष्ट लिहा.

४. भारतातील कोणत्याही दोन धर्मांची नावे सांगा.

५. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील एक फरक सांगा.

**प्र.८. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (तीनपैकी दोन):** [४]

१. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष राज्यस्तरीय पक्ष आहे.

२. जातिव्यवस्था ही एक उतरंड आहे.

३. अमेरिकेत नागरिकांना शस्त्रे बाळगण्यावर बंधन नाही.

**प्र.९. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दांत लिहा (दोनपैकी एक):** [२]

१. आधुनिक काळात लोकांच्या सहभागासाठी कोणते मार्ग वापरता येतात?

२. लोकशाहीपुढील प्रश्नांचे दुहेरी स्वरूप स्पष्ट करा.